सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे ... क्र.९१२१ ठ. क्र......६६
दि.१२/१२/१८...रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१२१

परिवहन उपक्रमाकडील बसच्या तिकीट दरात अल्पशी वाढ करणेबाबत प्रस्तावात नमुद कारणास्तव मा.सर्व साधारण सभा सो.म.पा. (सो.म.पा.परिवहन उपक्रम अंदाजपत्रक) ठराव क्रमांक ६ दि.०५/०७/२०१७ मधील सुचना व शिफारशी क्र.३ नुसार प्रस्तावा सोबत जोडणेत आलेल्या साध्या बसच्या व व्हाल्वो ए.सी. बसच्या प्रचलीत व प्रस्तावीत तिकीट दराच्या तक्त्याचे अवलोकन होऊन प्रस्तावित तिकीट दराच्या तक्त्या प्रमाणे मुबंई प्रांतिक महाअधिनियम कलम ३४३ (१) अन्वये आकारणी करणेस मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.परिवहन समिती यांचे शिफारसअंती मा.सर्वसाधारण सभा सो.म.पा.यांचे कडे सादर करणेकामी मा.सहा.आयुक्त तथा परिवहन व्यवास्थापक यांचे दि.२५/१०/२०१७चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.परिवहन समिती ठ.क्र.४७ दि.३०/१०/२०१७ अन्वये मान्यतेने मा.सर्वसाधारण सभेचे मान्यतेस्तव मा.परिवहन समितीच्या शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

Scanned with
CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज.922 ठ. क्र......८७ दि. 12/12/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मानधनावरील वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांचे मुदतवाढीबाबत सोमपा आरोग्याधिकारी कार्यालयाकडे वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिका-यांची पदे मानधनावर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने भरणेकामी दि. ३१-१-२०१४ रोजी निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यांत येऊन सदर यादीतील प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद १ ते ८ वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांची निवड करण्यांत आलेली होती. सदर नियुक्तीची मुदत दि. ८-८-१६ रोजी व यादीतील अ.क्र. ९ मधील वैद्यकीय अधिकारी यांची दि. २२-८-१६ रोजी संपत असल्याने प्रस्तावात नमूद कारणास्तव १ ते ८ वैद्यकीय अधिक्षक यांना दि. ९-८-१६ व दि. १०-८-१६ असे दोन दिवस तांत्रिक खंड देऊन दि. ११-८-१६ तसेच अ.क्र. ९ वरील उमेदवारास दि. २३-८-१६ व दि. २४-८-१६ असे दोन दिवस तांत्रिक खंड देऊन दि. २५-८-१६ पासून अकरा महिन्याच्या कालावधीकरिता करारपध्दतीने एकवट मानधनावर मुदतवाढ मिळणेकामी मा. स्थायी समिती यांचे मार्फत मा. सर्वसाधारण सभेकडे मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २२-१०-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ७८८, दि. १९-१२-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन करुन संबंधिताची मुदतवाढ नामंजूर करणेत येत असून, नव्याने जाहिराती देवून अर्ज मागवून वेतनश्रेणीवर नियुक्ती करणेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३५२ दि.०७/०१/२०१७ ने मा सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेले आहे.

यावर मा.आयुक्त यांनी दि.७-१-१७ स.स.विषय -३६७ ठराव ३५२ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मात्र वेतनश्रेणीवर नियुक्ती देण्याबाबतची प्रक्रिया अद्याप झालेली नाही. आकतीबंध शासनास सादर करण्याची बाब अंतीम स्तरावर आहे. तथापि,शहरातील आरोग्यसेवा सूरळित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून यापूर्वी दिलेली मुतदवाढ संपुष्टात आल्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील ११महिन्यांसाठी अथवा regular पदभरती होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, अशा प्रकारे केवळ तात्पूरत्यां स्वरुपाची मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे. प्रस्ताव मा.स.स.कडे सादर करणेकामी मा.आयुक्तं यांचे दि.१८/१०/२०१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.123 ठ. क्र. ८८ दि.12/1/18 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१२३

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (राज्यस्तर) रस्ते विकास प्रकल्प - अंतर्गत मंजूर कामे विद्यमान रस्ता रुंदीनुसार विकसित करणे व जुना पुणे नाका ते अरविंद धाम ते ६ कमान ते सोरेगांव कॅम्प रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंग करिता रेल्वे कि.मी. ४५३/३-४ (दौंड - सोलापूर सेक्शन ) येथे रेल्वे भूयारी बांधणेकामी प्रस्तावात नमुद तक्त्यांचे अवलोकन होऊन तक्यात नमुद कारणास्तव ज्या रस्त्यांना पुर्ण रुंदी मिळत नाही ते रस्ते विद्यमान रुंदीसह विकसित करणेस, तक्ता **"उ"** मधील अ.क्र.५ व ६ ही कामे वगळणेस, त्यातून शिल्लक राहणारे रु.११.१७ कोटी रकमेतून अरविंद धाम जवळ ( रेल्वे कि.मी.४५३/३-४) येथे रेल्वे भुयारी मार्गाचे रु.१६.७६ कोटी खर्चाचे काम या प्रकल्पाअंतर्गत ( अनुदान राज्यशासन ७०% अनुदान व म.न.पा. ३०% हिस्सा या तत्वावर) घेणेस, त्यास्तव कमी पडणारी र.रु. ५.६१ कोटीची शासनाकडे मागणी करणेस, योजनेचे अनुषंगाने आवश्यकतेनुसार आवश्यक ती कार्यवाही ठेवणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मा.म.न.पा.सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२५/०९/२०१७ च्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

प्रस्तुत योजनेतील सर्व मंजूर रस्त्यापैकी ज्या रस्त्यांना विकास योजनानुसार पूर्ण रुंदी मिळत नाही, असे रस्ते विद्यमान रुंदीसह विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे. भूसंपादना अभावी अविकसित रस्त्याचे कामांमुळे होणा-या बचतीची रक्कम अरविंदधाम येथील प्रस्तावित रेल्वे भुयारी मार्गासाठी वर्ग करणेस, रेल्वे भुयारी मार्गाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान योजनेत (राज्यस्तर) समाविष्ठ करणे, कमी पडणारी रक्कम शासनाकडे मागणी करणेस योजनेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीचे व पत्रव्यवहाराचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेत येत आहेत. कामाची क्वॉलिटी मा. आयुक्तांनी तपासूनच संपूर्ण अहवाल मनपा सभागृहासमोर सादर करावे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे [illegible] प्र.क्र. 128 ठ.क्र. ......89
दि. 21.2.18 ......रोजी केला त्यावरील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र.१४ मध्ये किडवाई चौक ते बाराईमाम चौक पर्यंत पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणेकामी प्रस्तावात नमुद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणन पत्रक क्र. सन २०१७-२०१८ र.रु.२०,२९,७५५/- चे तयार केले असून, सदर कामाकरिता चालू आर्थिक सर्षातील अंदाजपत्रकातील पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे या भांडवली बजेट हेड मधून तरतूद होणेस्तव व पुर्वगणनपत्रकास सक्षम मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि.२३-०९-२०१७ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सध्या हद्दवाढ भागामध्ये आठ दिवसातून एकदा टँकरने पाणीपुरवठा केला जातो. तरी हद्दवाढ भागामध्ये ज्या ठिकाणी पाण्याची पाईप लाईन नाही व सध्या ज्या भागात टँकर चालू आहेत अशा भागात प्राधान्याने पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष १०
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १२५ ठ. क्र. ........
दि. २१.५.१८........ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहर हागणदारीमुक्त करण्यासाठी प्रस्तावात नमुद कारणास्तव सोलापूर शहर हागणदारमुक्त घोषित करणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. तद्नंतर केंद्रीय तपासणी पथकाच्या तपासणी अंती केंद्र शासनाकडून शहर हागणदारीमुक्त झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होणार आहे. तसेच सदरचा हागणदारीमुक्त शहराचा दर्जा कायम राखण्यासाठी पुन्हा दर सहा महिन्यानी केंद्रीय पथक तपासणी करुन प्रमाणपत्राची नुतणीकरण करणार आहे. सबब सोलापूर शहर हागणदारीमुक्त झालेचे घोषित करणेस्तव मा. आयुक्त यांचे दि.०७/११/२०१७ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तथापि शौचालयासाठी वैयक्तीक लाभार्थ्यांनी अर्ज केलेस त्यांना अनुदान देणेची कार्यवाही ठेवणेसही मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

दान
ने

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १२६ ठ. क्र. ५१
दि. [illegible] रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला

१२६

शहरातील विविध प्रभागातील सार्वजनिक शौचालय पे अँड युज तत्वावर चालवण्यासाठी देणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात नमुद कारणास्तव पे अँड युज तत्वावर ना नफा ना तोटा या पध्दतीने सुरुवातीस कांही २० सीट एकत्रीत असलली शौचालये चालविणेस द्यावयाची आहेत. त्यानंतर त्यास मिळणारा प्रतिसाद पाहून टप्प्या-टप्याने शहरातील सर्व शौचालय पे अँड युज तत्वावर स्वयंसेवी संस्था/सहाकारी सेवा संस्था/सफाई कामगार संस्था/महिला बचत गट अथवा अशा प्रकारचा कामाचा अनुभव असणा-या व्यक्ती यांच्या कडून स्वारस्य मागणीपत्र ( Letter of intrest) घेणे करीत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीकरण देऊन विहित नमुन्यात अर्ज व पुराव्याची कागदपत्रे मागवून संस्थेस अथवा व्यक्तीस सार्वजनिक शौचालय वापरणा-या व्यक्ती कडून १/- रुपये (एक रुपये) शौचालय वापर शुल्क म्हणून स्विकारणेस, अतिरिक्त शुल्क आकारल्यास कायदेशीर कारवाई करणेबाबत तथापी सार्व. शौचालय स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असून प्रथमत: केवळ नमुद ३३ ठिकाणे या तत्वावर चालवायची असून त्याप्रमाणे मान्यता मिळणेबाबत सदरची बाब धोरणात्मक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे मंजूरीस्तव मा.आयुक्त यांचे दि.०७/११/२०१७ चे टिपणीचे अवलोकन केले.

महानगरपालिकेच्या वतीने आरोग्याच्याबाबतीत अनेक मोफत योजना राबविल्या जातात. त्यामुळे यासाठी नागरीकांकडून पैसे घेणे इष्ट होणार नाही. स्वच्छ भारत योजना अभियाना अंतर्गत म.न.पा.चे निधीमधून सदरची योजना राबविणेत यावी.

पूर्वी प्रमाणेच नागरीकांसाठी मोफत व्यवस्था ठेवणेत यावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

CS Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे दि.रा. क्र. ९/२१६ ठ. क्र......12
दि. १२.५.२०१९... रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. १२७

प्र.क्र.६ मधील प्रतिक्षा नगर समोरील चौकास **शिवाई चौक** असे नामकरण करणेची त्या परिसरातील नागरिकांची मोठया प्रमाणात मागणी असून त्या प्रमाणे तिन्ही बाजूस असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढील [illegible] क्र. ९२८ ठ. क्र. ....83
दि. [illegible] [illegible] खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ९ मधील शहरातील मुख्य जागेत कै. पांडुरंग पुंजाल क्रिडांगण या नावाने ओळखले जाणारे ग्राऊंड हे विविध खेळांकरिता प्रसिध्द आहे. सदर मैदानावर सकाळी व्यायाम व मॉर्निंगवॉकसाठी येत असतात. तसेच इतरवेळेला सर्व लहान मोठे खेळाडू विविध प्रकारचे खेळ खेळत असतात. सध्या ग्राऊंड अनेक संस्थेच्या स्वखर्चाने लेव्हलिंग करणे व संरक्षण देणे इत्यादीचे काम काम करीत आहेत. या ग्राऊंडमध्ये खेळले गेलेले खेळाडू आज आंतरराष्ट्रीय संघामध्ये समाविष्ठ असल्याने सोलापूरचे नांव उज्वल केले आहेत. या ठिकणी वेळोवेळी अनेक स्पर्धात्मक सामने होत असतात.

परंतु सध्या या ग्राऊंडला व्यवसायिक स्वरुप येत आहे. सदरचे मैदान हे मनपाच्या मालकीचे असून, याठिकाणी सण उत्सवाच्यावेळी श्री. ची मूर्ती विक्रीला ठेवणे व दिवाळीच्यावेळेला फटाके विक्री करणेसाठी तेथे पत्र्याचे तात्पुरते स्वरुपाचे गाळे निर्माण करुन विक्रीसाठी उपलब्ध करुन देतात. यामुळे नागरीकांची मोठया प्रमाणात ये जा असल्याने व पत्र्याचे गाळे तयार करणेकामी खोदकाम करण्यात येत असते. यामुळे सदर क्रिडांगणाची दुरावस्था होऊन खेळाडूंच्या दैनंदिन खेळाच्या सरावामध्ये खंडीतपणा येत असते. कारण खड्डे बुजवून पुन्हा लेव्हल करणे अत्यंत जिकीरीचे व खर्चीक होत असल्याने अनेक संघटनांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

तरी सदर ठिकाणी सण उत्सवाच्यावेळी पत्र्याचे गाळे न उभारता ग्राऊंड फक्त विविध प्रकारच्या खेळासाठी आरक्षित ठेवणे आवश्यक व गरजेचे आहे. वरील श्रींची मूर्ती व फटाके स्टॉलसाठी गाळे बांधणेसाठी बाजूला वॉलचंद कॉलेजच्याजवळ व हवामान खात्याच्या मध्ये मोठया प्रमाणात जागा शिल्लक आहे तसेच कर्णिकनगरच्या बाजूला पद्मानगरसमोर ओपन स्पेसमध्ये अनेक कार्यक्रम होत असतात त्याठिकाणी अशा प्रकारचे गाळे उभारल्यास तेथील कामाची सोय होऊन ग्राऊंड चांगल्या प्रकारे देखभाल करण्यास सुकर होणार आहे.

वरील प्रस्तावातील सर्व बाबीचा विचार करुन मा.आयुक्त यांनी स्पष्ट अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष ९४
एवं साधारण सभेपुढे विषय क्र. ९२ ठ. क्र. ......९४
दि. १२/१२/१९ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री.ऋषीकेश प्रभाकर क्षिरसागर, राहणार- २७२/अ, एकता नागर, सोलापूर यांच्या बहिणीची मुलगी कु.भक्ती संतोष मैंदरकर वय वर्षे ८ असून हीस लॉंग टेनीस या खेळाची अत्यंत आवड असून तिने सोलापूर शहर व जिल्हा पातळीवर लॉंगटेनीस स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविले असून तिला महाराष्ट्रातही संपन्न होणाऱ्या लॉंगटेनीस स्पर्धेत भाग घ्यावयाचा असतो.

परंतु तिचे वडील श्री.संतोष बाळकृष्ण मैंदरकर, हे मयत झालेले असून सदरील मुलीचा सांभाळ व पालापोषण हे तिचे मामा श्री.ऋषीकेश प्रभाकर क्षिरसागर हेच करतात. त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आयोजीत करण्यात आलेल्या लॉंगटेनीस स्पर्धेत ते त्यांच्या भाच्चीला घेऊन जाऊ शकत नाहीत. तिला खेळासाठी लागणारे उत्तम दर्जाचे क्रिडासाहित्य घेऊन देऊ शकत नाहीत.

तरी सदरील मुलीच्या लॉंगटेनीस मधील क्रिडानैपुण्य पाहूना तिला देशपातळीवर खेळण्याची संधी मिळणेसाठी व सोलापुरचे नांव लौकीक वाढविण्यासाठी जास्तीत जास्त अर्थ सहाय्य मिळणेकामी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे ... क्र. 130 ठ. क्र.......54
दि. 15.5.18 रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरात अनेक जातीचे अनेक समाजाचे लोक राहतात. सोलापूर शहरात विविध प्रकारचे समाजाचे लोक एकत्र आणि गुण्यागोविंदाने राहतात. तसेच सोलापूर शहरामध्ये मोची समाज व मुस्लीम समाज मोठया संख्येने एकत्र राहतात.

तरी सोलापूर शहराचे नाव बदलुन मोची समाजाचे कुलगुरु जांबमुनी महाराज किंवा सोलापूरचे सुफिसंत शहाजहुर असे नांव देण्यास मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १३३ ठ. क्र. ......९९ दि. ९/१/२०१८ रोजी ठेवता खालील प्रमाणे ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१३३

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा सविस्तर अहवाल प्रस्तावात नमूद कारणास्तव **ENGARCH ARCHITECT STRUCTUERAL CONSULTANT** कोल्हापूर यांची निवड झाली असून, त्यांचेकडून सन २०१६-१७ व २०१७-१८ सालाचे डीपीआर तयार करणे, करारपत्रक तयार करणे वर्कऑर्डर देणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. कार्यकारी संचालक **MUDM** यांच्या पत्राच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २२-४-२०१७ च्या परिपत्रकानुसार सदर एजन्सीकडून डीपीआर तयार करुन घेऊन प्रकल्पाच्या १.५ टक्का इतकी रक्कम सल्लागार फी म्हणून पारित करण्याच्या निर्णयानुसार सदर ठिकाणचे डीपीआर तयार करण्यात आलेला आहे.

प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरासाठी हरित क्षेत्र विकास प्रकल्पास सदर शासन निर्णयानुसार प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शासन नियुक्त **ENGARCH ARCHITECT STRUCTUERAL CONSULTANT** कोल्हापूर यांनी दिनांक ११-९-२०१७ रोजी दिलेल्या डीपीआर नुसार र.रु. २.०० कोटीचे तयार करुन, मा. शासनाने त्यास शासन निर्णय क्र. अमृत-२०१६/ प्र.क्र./१८७/न.वि. ३३, अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावातील बाब क्र. १ ते ३ व बाब क्र.१ ते ४ मध्ये नमूद नुसार कार्यवाही ठेवणेकामी प्रकरणात नमूद प्रमाणे मा. स्थापत्य समितीची शिफारस घेऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २६-१०-२०१७ चे टिपणीप्रमाणे मा.स्थापत्य समिती ठराव क्र.१११ दि.१४/११/२०१७ शिफारसीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रकरणातील सर्व ओपन स्पेसेस महानगरपालिकेकडे हस्तांतरण करुन घेऊन सदरची कामे करणेस ही सभा मान्यता देत आहे.

Gaikwad P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकुब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १३४ ठ. क्र. ८०
दि. १२.१२.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेचे क्रीडा विभागाकडील स्वा. सावरकर जलतरण तलाव व जिमखाना नुतनीकरण करणेकामी मा. राज्य शासनाकडून अनुदान मिळणेकामी दि. २६-९-२०१७ रोजी शालेय शिक्षण उच्च तंत्रज्ञान व क्रीडामंत्री मा.ना. विनोदजी तावडे साहेब यांना मा. महापौर यांनी निवेदन सादर केलेले असून त्यावेळी मा. मंत्रीमहोदयांनी विषयांकित कामे शासकीय प्रस्ताव पाठविणेस सूचित केलेले आहे. त्या अनुषंगाने मनपा पॅनलवरील आर्कीटेक्ट श्री. संतोष किर्तने यांचेकडून सदर कामाचे डीपीआर, अंदाजपत्रके, नकाशे, इत्यादी तयार करणेकामी दि. १-११-२०१७ रोजी मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आर्कीटेक्ट श्री. संतोष किर्तने यांनी सदर कामाची सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. १० रक्कम रुपये ९६ लाख ३२ हजार २०० रुपये इतकेचे तयार केलेले आहे. सदर पूर्वगणनपत्रकातील सन २०१७-१८ चे डीएसआर दराने करणेत आलेले असून सदरचा डीपीआर सोबत जोडणेत आलेला आहे. सदरचे डीपीआर मा. शासनाकडील अनुदान प्राप्त होणेकरिता सादर करणेचा आहे. विषयांकित पूर्वगणनपत्रकास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर करणेत येत आहे. मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळाल्यानंतर सविस्तर ठरावास डीपीआर मा. शासनाकडे १०० टक्के अनुदान प्राप्त होणेकामी सादर करणेत येत आहे. सदरची पूर्वगणनपत्रक क्र. १० रक्कम रुपये ९६,३२,२०० यास तातडीची बाब म्हणून मा. सर्वसाधारण सभेची मंजूरीस्तव सादर करणेस व तसेच सदरचे काम तातडीने मा. शासन अनुदानातून करणेचे असलेने प्रस्तावित प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १४-११-२०१७ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१३५ ठ. क्र.......१८ दि.१५/२/१८......रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका प्र.क्र.२० क मधील प्रतिभा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.कुमठा नाका, सोलापूर या संस्थेतील प्लॉट नं.१७ जवळील ओपन जागा असून, त्या जागेमध्ये चिल्ड्रन पार्क व वॉकींग ट्रॅक व बाग निर्माण करणेकामी जरुर ती कार्यवाही करणे, या कामाचे प्लॅन व एस्टिमेट तयार करणेस, याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

प्र.क्र.२०मध्ये कोणत्याही परिसरामध्ये उद्यानाची सोय नसून, सदर ठिकाणी उद्यान झाल्यास या ठिकाणच्या लोकांच्या मनोरंजनाची व लहान मुलांच्या खेळाकरिता सोय होईल.

तरी वरीलबाबत जरुर ती कार्यवाही करणेस मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

CS Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.७१३६ ठ. क्र....९९ दि.९५.२१.१८ रोजी ठेवता बहुमताने/सर्वानुमते पास झाला

१३६

सोलापूर महानगरपालिकेच्या सभेमध्ये विषय समिती सदस्यांची निवड करुन त्या त्या समितीचे कामकाज सद्या चालू आहे. त्याच प्रमाणे परिवहन समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळा मार्फत सर्वात जास्त आर्थिक उलाढाल होत असते. परंतु नवीन नगरसेवकांची निवड होऊन जवळपास आठ महिने होऊन गेले. परंतु प्रशासनाच्या वेळकाढूपणामुळे आजअखेर शिक्षण मंडळाच्या सदस्यांची निवड अद्याप केलेली नाही. शिक्षण मंडळासारख्या उपक्रमामध्ये अनेक विषय समितीच्या मंजुरीने करावयाचे असतात.

तरी तातडीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४ (२) नुसार अथवा आर.टी.ई ॲक्टनुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० नुसार सो.म.पा.शिक्षण मंडळ अस्तित्वात आणून लोकशाही पध्दतीने कामकाज करणेस व सोमपा शिक्षण मंडळ सदस्य निवड करण्यास मान्यता देणेत येत आहे.

शिक्षण मंडळ समितीची स्थापना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० नुसार करावयाचे झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३१-अ च्या तरतूदीप्रमाणे स्थापीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या ६ विशेष समिती म्हणजे १) स्थापत्य समिती २) विधी समिती ३) वैद्यकीय सहाय्य नि आरोग्य समिती ४) कामगार व समाज कल्याण समिती ५) मंडया नि उद्यान समिती ६) शहर सुधारणा समिती या समितीच्या सभेच्या कामकाजाचे नियम शिक्षण मंडळाच्या समितीच्या कामकाजासाठी लागू राहतील.

स्कोप ऑफ बिझनेस म्हणजे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या व त्यांच्या अखत्यारीतील प्राथमिक शाळा व हायस्कूल यांचेकडील कामकाज करणेचे आहे.

शिक्षण समितीकडील धोरणात्मक विषयावर निर्णय घेणेचे अधिकार महानगरपालिकेस राहतील. तसेच सदर समितीचे कामकाज आरटीई कायद्यातील तरतूदी व महाराष्ट्र महानगरपालिकेचे अधिनियमाचे तरतूदी नुसार आरटीई कायद्याच्या तरतूदीस बाधा न येता शिक्षण समितीचे कामकाज करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner